देशोन्नती 27/10/2024

# पोलिस कारवायात १० दिवसात ६३ लाखाचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन

**आचारसंहितेचे ४ गुन्हे दाखल**

**नांदेड** : पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सुरू केलेल्या ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत विविध पोलिस ठाण्याअंतर्गत १५ ते २५ ऑक्टोबर या दहा दिवसांच्या कालावधीत १५२ गुन्हे दाखल करून ६३ लाख २३ हजार २७१ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत अवैध व्यवसायावर कारवाई करणे, एनबिडब्ल्यु वॉरंट बजावणी करणे तसेच ईतर कारवाई करणे संदर्भात आदेश दिले होते. त्या अनुषंगाने पोलिसांनी १५ ते २५ ऑक्टोबर यां कालावधीत विविध कारवाया करून ६३ लाख २३ हजार २७१ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये १८ लाख ३ हजार ४९५ रुपयांची दारू, ३ लाख ६८ हजार ६७६ रुपयांचा गुटखा, १२ लाख ५० हजार रुपये नगदी रक्कम जप्त, २९ लाख रुपये किमतीची ११ वाहने जप्त करण्याची कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाई पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलिस अधीक्षक खंडेराय धरणे, सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, स्थागुशाचे पोनि उदय खंडेराय व पोलिस कर्मचाऱ्यांनी केली आहे.

देशोन्नती 27/10/2024

# कोम्बींग ऑपरेशन अंतर्गत पोलिसांची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन

**'स्थागुशा'च्या पथकाने एक गावठी पिस्तूल, तलवारी जप्त करुन तिघांना केली अटक**



**नांदेड** :निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशानुसार २६ ऑक्टोबर रोजी कोम्बींग ऑपरेशन मोहीम राबविण्यात आली. यामध्ये स्थागुशाच्या पथकाने तिघांना अटक करुन एक गावठी कट्टा, दोन तलवारी व खंजर जप्त केले असून संयुक्त कारवाईत १ लाख ५६ हजार ७३१ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर २६ ऑक्टोबर रोजी कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात आले. या कारवाईत ३९ केसेस करुन ४२ आरोपींना अटक केली असून १ लाख ५६ हजार ७३१ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. विविध गंभीर गुन्ह्यातील १४२ आरोपींची तपासणी करण्यात आली असून पाहीजे व फरारी ६० आरोपींची तपासणी करण्यात आली. एम. व्ही. ॲक्टप्रमाणे २४ केसेस करुन १२ हजार ५०० रुपये दंड आकारण्यात आला. गोवंश प्रतिबंधक कायद्यानुसार तिघांना ताब्यात घेतले असून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिवाजीनगर व इतवारा हद्दीत तिन आरोपींना अटक करुन एक गावठी पिस्तूल, दोन तलवारी व खंजर जप्त केले. फरार तीन आरोपींना अटक केली आहे. सदर कारवाईत पोलिस अधिक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलिस अधिक्षक सुरज गुरव, स्थागुशाचे पोनि उदय खंडेराय व सर्व प्रभारी अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते.